नियमित दिवाणी मुकदमा क्र. २७ सन २०२२
(श्री. कृष्णा पालव वगैरे – वादी वि. श्री. संदिप सावंत वगैरे–प्रतिवादी )
निशाणी १२ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादी यांनी सदरचा दावा, दावा मिळकतीमध्ये हक्कप्रस्थापना, प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकतीत बांधकाम करु नये म्हणून कायम ताकीद आदेशासाठी व दरम्यानच्या काळात प्रतिवादी नं.१ ने बांधकाम केल्यास ते काढून टाकून मिळकतीचा खुला कब्जा मिळावा यासाठी दाखल केला आहे. सदरचा दावा हा अतिक्रमणाबाबत असल्याने वादीने दाव्यासोबत नकाशा जोडणे आवश्यक आहे व वादीने दाव्यात दाव्यासोबत हात नकाशा जोडलेला आहे असा उल्लेख दाव्यात केलेला आहे. परंतु सदरचा नकाशा नजर चुकीने जोडण्याचा राहून गेला आहे. सदरचा हात नकाशा दाव्यासोबत न जोडल्यास वादीचे पैशाचे रुपाने कधीही भरुन ने येणारे असे नुकसान होणार आहे. तरी अर्जासोबत दाखल केलेला नकाशा दाव्यासोबत जोडण्याची परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज खोटा, खोडसाळ व दिशाभुल करणारा आहे. प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही. नजचुकीने दाव्यासोबत जोडावयाचा राहिलेला नकाशा नव्याने दाव्यासोबत जोडण्याची कोणतीही तरतुद नाही. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी न्यायालयास, प्रदान केलेल्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही वेळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावा खर्चविषयक अटीवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चुक सुधारता येईल. वादपत्रामध्ये दुरुस्तीस परवानगी देत असताना दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही, तसेच प्रस्तावित दुरुस्ती विरुध्द पक्षास त्रासदायक होणार नाही याची दक्षता न्यायालयाने घेणे आवश्यक असते. थोडक्यात दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल न करणारी व खराखुरा वाद निर्णित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायसंगत होते.

५. वादीने सदरचा दावा, हक्कप्रस्थापना, कायमची ताकीद व दरम्यानच्या काळात प्रतिवादी नं. १ यांनी बांधकाम केलेस सदरचे बांधकाम काढून दावा मिळकतीचा खुला कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा अतिक्रमणाचा असल्यामुळे त्यामध्ये दाव्यासोबत नकाशा जोडणे आवश्यक आहे. परंतु वादी यांच्या कथनाप्रमाणे नजरचुकीने दाव्यासोबत नकाशा जोडावयाचा राहून गेला आहे असे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतच्या दुरुस्ती अन्वये वादी सदर दाव्यामध्ये नकाशा दाखल करण्यासाठी परवानगी मागत आहेत. सदरची दुरुस्ती ही दोन्ही पक्षांतील खराखुरा वाद अंतिमरित्या निर्णित होण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा नकाशा दाव्यासोबत जोडणे आवश्यक आहे असे दिसून येते. सबब अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १८ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधीन राहून दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/–

दिनांक :– २६/०४/२०२२

(अ. जो. बाचुळकर),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कुडाळ.